# भारत महाविद्यालय,जेऊर(म.रेल्वे),ता.करमाळा,जि.सोलापूर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग अहवाल २०१९-२०२०

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये एकूण ९६ स्वयंसेवक व स्वयंसेविका विद्यार्थी कार्यरत आहेत.

(१) राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे-कोंढेज,ता.करमाळा येथे दि.०४.०२.२०१९ ते १०.०२.२०१९ या कालावधीत संपन्न झाले. सदर शिबीरामध्ये ४६ स्वयंसेवक/स्वयंसेविका सहभागी झाले होते. शिबीर कालावधीमध्ये संत गाडगेबाबा यांचे समाज प्रबोधनपर कार्य, वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन, व्यक्तिमत्व विकासामध्ये संवाद कौशल्याचे महत्व, स्वच्छता अभियान काळाची गरज, प्रसिध्दी माध्यमे व रोजगाराच्या संधी या विषयावर वक्त्यांनी व्याख्याने दिली. त्याचबरोबर शिबीरामध्ये ग्रामस्वच्छता, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, जलसाक्षरता व व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तिमत्व विकास, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपन, अंधश्रध्दा निर्मुलन पथनाटय, महिला प्रबोधन व हळदीकुंकू मेळावा इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.

(२) महाराष्ट्र शासन व विद्यापीठाच्या आदेशानुसार दि.०१ जुलै ते ३० सप्टेंबर,२०१९ या कालावधीमध्ये वृक्ष लागवड अभियानातंर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र,जेऊर येथे वृक्ष लागवड करण्यात आली.

(३) संस्थेचे अध्यक्ष मा.आमदार नारायण(आबा)पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीरामध्ये १५९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.अनिल मुंगूसकर व डॉ.पंडित बन्ने तसेच स्वयंसेवक विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

(४) पंढरपूर आषाढी वारी,२०१९ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाची कार्यशाळा महाविद्यालयामध्ये संपन्न झाली.

(५) दि.११.०७.२०१९ रोजी तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामूहिक शपथ कार्यक्रम घेण्यात आला.

या व्यतिरिक्त एनएसएस विभागाच्या नियमित कार्यक्रमातंर्गत विविध समाजउपयोगी व प्रबोधनपर कार्यक्रम अविरत चालू आहेत.

*****




संस्थेचे अध्यक्ष मा.आमदार नारायण(आबा)पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीरामध्ये १५९ रक्तदात्यांनी रक्तदान केले.




महाराष्ट्र शासन व विद्यापीठाच्या आदेशानुसार दि.०१ जुलै ते ३० सप्टेंबर,२०१९ या कालावधीमध्ये वृक्ष लागवड अभियानातंर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र,जेऊर येथे वृक्ष लागवड करण्यात आली.




**पंढरपूर आषाढी वारी,२०१९ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाची कार्यशाळा महाविद्यालयामध्ये संपन्न झाली**